# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**५९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २२.०९.२०२६**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१५/०९/२०२६ ते २१/०९/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२३/०९/२०२६ ते २७/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | < दिनांक > | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ३ | २ | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३३ | ३३ | ३३ | ३४ | ३४ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २४ | २३ | २३ | २३ | २३ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ४ | ३ | ३ | ३ | २ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८३ | ८२ | ८० | ८२ | ८३ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५२ | ४३ | ३९ | ४७ | ५० |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ११ | १६ | १४ | १९ | २५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **पुढील दोन दिवस काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | **१) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.**<br>**२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.**<br>**३) शेतकऱ्यांना आवश्यक ती कृषी विषयक माहिती, हवामान अंदाज, बाजारभाव, कीड-रोग ओळख व नियंत्रण उपाय, हवामान आधारित कृषि सल्ला, गोदामे व कृषी यंत्रसामग्री भाडे केंद्र यांची माहितीकरीता महाविस्तार ऍपचा वापर करावा.** |
| संदेश | | **पुढील दोन दिवस काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सोयाबीन | फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था | पिकाच्या फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत सिंचनाला प्राधान्य द्यावे. पिकांना शक्यतो ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे संरक्षित पाणी द्यावे. |
| भुईमूग | आ-या उतरणे ते शेंगा भरण्याची अवस्था | पिकाच्या फुलोरा, आ-या सुटणे आणि शेंगा विकसित होण्याच्या अवस्थेत सिंचनाला प्राधान्य द्यावे. पिकांना शक्यतो ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे संरक्षित पाणी द्यावे. |
| कपाशी | फुले उमलणे ते बोंड धरणे | कापसासाठी बोंडे लागणे व बोंडे भरणे या अवस्था महत्वाच्या असून पावसाचा खंड पडल्यास उपलब्ध पाणी असल्यास ठिबक सिंचन किवा एक सरी आड सरी पद्धतीने पाण्याचे नियोजन करावे. |
| तूर | फांद्या फुटणे ते फुलोऱ्याची अवस्था | पावसाचा खंड असल्यास वाढ व फुलोऱ्यावर परिणाम होऊ शकतो. त्यासाठी संरक्षित पाणी द्यावे. |
| मूग/ उडीद | काढणी | पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला माल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| खरीप पिके | | सर्व उभ्या पिकांना फुले बायोमिक्सची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास फुले ग्रेड ।। ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>बाष्पीभवन कमी करण्यासाठी पिकांच्या ओळींमध्ये पेंढा, पिकांचे अवशेष किंवा उसाचे पाचट यांचे आच्छादन करावे.<br>जमिनीवरील भेगा बुजविण्यासाठी आणि मातीचे आच्छादन तयार करण्यासाठी हलकी कोळपणी किंवा आंतरमशागत करावी.<br>पुरेसा पाऊस किंवा सिंचन होईपर्यंत खतांची वरखत मात्रा देणे पुढे ढकलावे. पाऊस झाल्यानंतर जमिनीत पुरेसा ओलावा असताना खतांची मात्रा द्यावी. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | पिकांवर तीव्र ओलाव्याचा ताण असताना तणनाशके आणि कीटकनाशकांची फवारणी टाळावी.<br>कोरड्या हवामानाचा कालावधी वाढल्यास उपलब्ध पाण्याचा वापर सरीआड सरी पद्धतीने करावा आणि पिकांच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थांना सिंचनासाठी प्राधान्य द्यावे.<br>ओलाव्याचा ताण असलेल्या पिकांवरील रसशोषक किडी आणि रोगांचे नियमित निरीक्षण करावे. फवारणी केवळ शांत, पाऊस नसलेल्या आणि वारा कमी असलेल्या हवामानात करावी. |
| **पशुधन व्यवस्थापन** | | १) खरीप पिकांचा कडबा, भुसा आणि इतर पिकांचे अवशेष योग्य प्रकारे साठवून ठेवावेत.<br>२) जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा उपयोग करून चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करावी.<br>३) मका पीक उपलब्ध असलेल्या ठिकाणी मक्यापासून मुरघास तयार करून साठवून ठेवावा.<br>४) बांधावरील गवत योग्य पद्धतीने कापून, वाळवून आणि रचून ठेवावे.<br>५) भाताचा पेंढा आणि नाचणीचे काड यांच्यावर १ टक्का युरिया द्रावणाची प्रक्रिया करून त्यांची योग्य प्रकारे गंजी लावून साठवण करावी.<br>६) परतीचा पाऊस झाल्यास कडवळ किंवा चाऱ्यासाठी ज्वारी किंवा मका पिकांची लागवड करावी. अतिरिक्त हिरवा चारा चांगल्या प्रकारे वाळवून त्याचे पुढील आपत्कालीन परिस्थितीत वापर करावा.<br>७) पावसाचे प्रमाण कमी असतानाही चांगली वाढणारी आणि प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकणारी चारा पिके, जसे की संकरीत नेपिअर, दशरथ आणि स्टायलो, यांची लागवड करावी.<br>८) चारा टंचाईच्या काळात उपलब्ध चाऱ्याची कुट्टी करून जनावरांना गव्हाणीतून द्यावा. तो एकाच वेळी मोठ्या प्रमाणात न देता जनावरांच्या गरजेनुसार टप्प्याटप्प्याने द्यावा. तसेच, कमी प्रतीचा चारा चांगल्या प्रतीच्या चाऱ्यासोबत योग्य प्रमाणात मिसळून दिल्यास उपलब्ध चाऱ्याचा अधिक परिणामकारक उपयोग करता येतो. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : कृषि महाविद्यालय, धुळे.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २२.०९.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**